**शासकीय अध्यापक महाविद्यालय,गोधनी रोड,यवतमाळ**
**सफाई कामगाराचे 01 पद कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता निविदा सन 2026-2027.**

शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ येथे आर्थिक वर्ष 2026-2027 मध्ये 01.07.2026 ते 31.3.2027 या कालावधीकरीता सफाई कामगार - 01 पद कंत्राटी पध्दतीने भरण्याकरीता विहित आवेदनपत्र शासनमान्य कंत्राटदार / पंजीकृत बेरोजगारांच्या सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्राकडुन द्विलिफाफा पध्दतीने मोहोरबंद निविदा मागविण्यात येत आहे. यासोबत संस्थेचे पॅन कार्ड,जी.एस.टी.क्रमांक निविदेवर नमुद करावा,मागील 3 वर्षाचे इंकम टॅक्स रिटर्न,अनुभवाचे प्रमाणपत्र,संस्थेच्या नोंदणीचा दाखला,राज्य कर्मचारी विमा निगम नोंदणी प्रमाणपत्र,क्षेत्रिय भविष्य निर्वाह निधी कर्मचारी 1952 अंतर्गत नोंदणी सोबत जोडावे. विहित नमुन्यात कोरे निविदा पत्र,अटी व शर्ती तसेच सफाई कामगार यांच्या कामाचा माहिती दर्शक तक्ता शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ यांचेकडे प्रति शेडयुल रु.500/- चा भरणा करुन दिनांक 15.06.2026 ते 23.6.2026 पर्यंत सकाळी 11 ते 5 वाजेपर्यंत सुटीचे दिवस वगळुन मिळू शकतील व दि.24.6.2026 ते 29.6.2026 पर्यंत सुटीचे दिवस वगळुन कार्यालयीन वेळेत सकाळी 11 ते 5 वाजेपर्यंत स्वीकारण्यात येतील. मोहोरबंद निविदा दिनांक 30.6.2026 रोजी सकाळी 11 वाजता प्राचार्य,शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ यांचे दालनात उघडण्यात येईल.सदर कंत्राट दिनांक 01.07.26 ते 31.3.2027 पर्यंत या कालावधीकरीता किंवा या आधी नोटीस देऊन खारीज करण्यात येईपर्यंत प्रदान करण्यात येईल.निविदा स्वीकारण्याचे अथवा नाकारण्याचे अधिकार प्राचार्य,शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ यांनी राखुन ठेवले आहेत.या महाविद्यालयाची वेबसाईट www.govt-bed-ytl.org वर सदर जाहिरात तसेच अटी व शर्ती उपलब्ध आहे.

प्राचार्य,
शासकीय अध्यापक महाविद्यालय,
यवतमाळ

**शासकीय अध्यापक महाविद्यालय यवतमाळ गोधनी रोड यवतमाळ - 445001**

**सफाई कामगार या पदाची कामे कंत्राटामार्फत करुन घेण्याबाबतची अटी व शर्ती.**

**ज्या कार्यालयात कंत्राटी पध्दतीने काम करावयाचे आहे त्या कार्यालयाचे नाव - शासकीय अध्यापक महाविद्यालय यवतमाळ, गोधनी रोड, नेहरु स्टेडीयम सामोर, यवतमाळ - 445001**

| अ.क्र. | पदाचे नाव | संख्या | कामाचे स्वरुप |
|---|---|---|---|
| 1 | सफाई कामगार | 1 | महाविद्यालयाच्या सर्व इमारतीमधील स्वछतागृह व शौचालय, परीसराची साफसफाई, आतील व आजूबाजुच्या परिसराची स्वच्छता तसेच प्राचार्य यांनी वेळोवेळी सांगीतलेली कामे. |

मा. सहसंचालक उच्च शिक्षण अमरावती विभाग अमरावती यांचे अधिनस्त असलेल्या शासकीय अध्यापक महाविद्यालय गोधनी रोड, नेहरू स्टेडीयम समोर यवतमाळ येथे आर्थीक वर्ष 2026-2027 कराराच्या तारखेपासू-ा दिनांक 31 मार्च 2027 पर्यत वरील पदाची कामे **आठ तासाकरीता** शासनमान्य संस्था/पंजीकृत बेरोजगार सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्र कंत्राटामार्फत करुन घेणे याकरीता मागणी करण्यात येत आहे.

**सफाई कामगार या कंत्राटी सेवेच्या अटी व शर्ती.**

१. कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना वेतन व त्या अनुषंगाने इतर सर्व भत्ते किमान वेतन कायद्यातील तरतुदीनुसार द्यावे.

२. कंत्राटदाराने शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ, गोधनी रोड, नेहरु स्टेडीयम समोर, यवतमाळ येथील कामकाजासाठी नेमलेले कंत्राटी कामगारांना किमान वेतन कायद्यातील तरतूदीपेक्षा कमी वेतन अदा केल्याचे निदर्शनास आले तर संबंधीत कंत्राटदारावर किमान वेतन कायद्यातील तरतूदीप्रमाणे कार्यवाही करण्यात येईल व त्यांचे कंत्राट तात्काळ रद्द करुन त्या कंत्राटदाराचे नाव काळया यादीत टाकण्याची कारवाई करण्याची शिफारस करण्यात येईल.

3. कंत्राटाचा कालावधी कोणत्याही परिस्थितीत 31 मार्च 2027 पेक्षा जास्त राहणार नाही.

४. किमान वेतन कायद्यातील तरतूदीनुसार कंत्राटदाराने कंत्राटी कामगारांना भरपगारी साप्ताहीक सुट्टी देणे बंधनकारक असेल व अशा सुट्टीच्या दिवशी कार्यालयास त्याऐवजी दुसरा कामगार उपलब्ध करुन देण्याची जबाबदारी संबंधीत कंत्राटदाराची असेल.त्याचे मानधन देय राहणार नाही.

५. सुट्टीच्या दिवशी कंत्राटी कामगाराकडून काम करुन घेतल्यास त्या दिवसाची बदली रजा देण्यात यावी मात्र अशी बदली रजा देतांना त्या दिवशी कार्यालयातील कामकाजाचा खोळंबा होऊ नये म्हणून दुसऱ्या कर्मचाऱ्यांची सोय करण्याची संपर्ण जबाबदारी कंत्राटदाराची असेल.

६. शासकीय वेळेनंतर कंत्राटी कामगारांना जास्तीचे शासकीय काम करावे लागल्यास त्यांना अतिकालीक भत्ता देणे कंत्राटदारास बंधनकारक असेल व सदर अतिकालिक भत्ता देण्याची सर्वस्वी जबाबदारी कंत्राटदाराची असेल. हा भत्ता कोणत्याही स्वरुपात व कधीही या कार्यालयाकडुन आपणास अदा करण्यात येणार नाही.

७. कंत्राटदाराने नेमलेल्या कंत्राटी कामगारांना कार्यालयात हजर होतांना व कार्यालय सोडतांना बायोमेट्रीक प्रणाली/हजेरीपत्रकावर त्याची उपस्थिती नोंदविणे बंधनकारक असेल व नोंदणीसाठी होणारा संपूर्ण खर्च कंत्राटदाराने उचलावयाचा आहे.

८. कंत्राटदारास त्याने नेमलेल्या कंत्राटी सफाई कामगार यांना किमान वेतन अधिनियम १९४८ मधील तरतूदीनुसार वेतन महागाई भत्ता इतर भत्ते व सवलती लागु राहतील.

९. शासनमान्य कंत्राटदार /पंजीकृत बेरोजगार सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्र या कंत्राटदारानीच निविदा सादर कराव्यात.

१०. ज्या कंपनीस/संस्थेस काम सोपविण्यात येईल त्यांनी त्याबाबतच्या अटी व शर्ती नुसार करार करणे आवश्यक राहील.

११. कंपनी/संस्थेतर्फे काम करणाऱ्या कर्मचाऱ्यांच्या सेवेचे कोणतेही उत्तरदायित्व शासनावर किंवा या कार्यालयावर राहणार नाही. नेमलेले कंत्राटी कर्मचारी नियमितते बाबत कोणतेही हक्क मागू शकणार नाहीत.

१२. कंत्राटदारामार्फत दिल्या जाणाऱ्या वरील सेवा/सुविधा इत्यादी बाबतच्या कार्यपध्दतीचा व कामाचा आढावा कार्यालयामार्फत वेळोवेळी घेण्यात येईल व वेळोवेळी सुचविलेल्या सुचनांचे काटेकोरपणे पालन करणे बंधनकारक राहील.

१३. कार्यालयास कंत्राटी पध्दतीने पुरविण्यात येणाऱ्या सोई-सुविधा/ काम यांचेसाठी जी कंत्राटी सेवा कंत्राटदारामार्फत उपलब्ध करुन देण्यात येणार आहे. त्याअनुषंगाने लागु असणारे सर्व कर कंत्राटदाराने अदा करावेत.

१४. उपरोक्त कामासाठी कंत्राटदारामार्फत ज्यांना कामे देण्यात येणार आहे. त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे नियम अटी व शर्ती लागू राहणार नाहीत. तसेच त्यांना नियमित कर्मचाऱ्यांप्रमाणे कोणतेही वेतन व भत्ते तथा अनुषंगीक लाभ अनुज्ञेय/लागू राहणार नाहीत.

१५. जर कार्यालयातील कोणतीही वस्तू चोरी/गहाळ झाली तर त्याची सर्वस्वी जबाबदारी संबंधित कंत्राटदारावर राहील तसेच त्याबाबतच्या सर्व परिणामांची जबाबदारी कंत्राटदार यांचेवर राहील.

१६. कंत्राटदाराने शासनमान्य कंत्राटदार /पंजीकृत बेरोजगार सेवा सहकारी संस्था/ लोकसेवा केंद्र कंत्राटदार असल्याबाबत, आयकर रिटर्न भरले बाबत, पॅन कार्ड, आधार कार्ड, रहीवासाचा पत्ता इत्यादी बाबतचे कागदपत्रे निविदेसोबत दाखल करावित.

१७. प्रत्येक कंत्राटदाराला सफाई कामगाराच्या अर्जासोबत **रु.15,000/- ( रु. पंधरा हजार फक्त )** चा धनाकर्ष डी.डी. Principal,Government College Of Education,Yavatmal या नावे काढुन अर्जासोबत जोडावा लागेल.कंत्राटदारास कंत्राट मिळाल्यावर जर त्याने कोणत्याही कारणाने हे कंत्राट नाकारल्यास किंवा कंत्राटी कामाचा स्वीकार न केल्यास तो धनाकर्ष जप्त करण्यात येईल व त्याची राशी परत करण्यात येणार नाही. जर कंत्राटदारास कंत्राट मंजुर न झाल्यास तोच धनाकर्ष त्याच्या मुळ स्वरुपात परत करण्यात येईल त्यावर कोणत्याही प्रकारचे व्याज देण्यात येणार नाही.

१८. महाविद्यालयामधील वर्गखोल्या,प्राध्यापक कक्ष, प्राचार्य कक्ष तसेच वसतिगृह व कार्यालय व ज्या ठिकाणी टाईल्स बसविले आहेत त्या ठिकाणी पोछा अनिवार्य राहील.

१९. सफाई कामगार यांच्या कामाच्या वेळा आठ तास राहील.सदर कामाच्या वेळा कार्यालयाने ठरवून दिल्याप्रमाणे राहतील.

२०. प्राचार्य अथवा कर्मचारी यांनी ज्याप्रमाणे सुचना देतील त्याप्रमाणे स्वच्छतेची कामे सफाई कामगार यांना काम करावे लागेल व काम न केल्यास त्यास सर्वस्वी कंत्राटदार जबाबदार राहील.

२१. १ सफाई कामगार पुरविणे कंत्राटदारावर बंधनकारक राहील.

२२. श्रमिकांच्या सेवेसंबंधी किंवा कोणतीही हमी महाविद्यालयाची राहणार नाही.

२३. श्रमिकांच्या निष्काळजीपणामुळे महाविद्यालय व वसतिगृह मालमत्तेचे नुकसान अथवा चोरी झाल्याचे आढळल्यास भरपाईची रक्कम कंत्राटदाराकडुन वसुल करण्यात येईल.

२४. पुरविण्यात आलेल्या सफाई कामगारांचे पुर्ण नाव , संपूर्ण पत्ता व त्याचा पासपोर्ट आकाराचा फोटोग्राफ आधार कार्ड ,निवडणुक ओळखपत्र / बँकेचे फोटो असलेले पासबुक तसेच चारित्र्याचे प्रमाणपत्र कंत्राटदाराने प्रमाणित करुन त्याचे ओळखपत्र महाविद्यालयात जमा करावे त्यामध्ये बालकामगार यांचा समावेश करण्यात येऊ नये.

२५. सफाई कामगार गैरवर्तणूक करणारा अथवा बेजबाबदार असल्यास त्याच्या बदली दुसरा श्रमिक पुरविण्याची जबाबदारी कंत्राटदाराची राहील.

२६. कामकाजाच्या वेळेस महाविद्यालयाच्या किंवा वसतीगृहाच्या परिसरात चौकीदाराचा नैसर्गिक अथवा अपघाती मृत्यु झाल्यास याची जबाबदारी महाविद्यालयाची राहणार नाही.

२७. कंत्राटदाराला कंत्राट बंद करावयाचा असल्यास त्यांनी महाविद्यालयाला एक महिना पूर्वसुचना देणे अनिवार्य आहे .

२८. कंत्राट मंजुरीचे आदेश प्राप्त झाल्यानंतर २ दिवसांत ५००/- रु. चे स्टॅम्प पेपरवर अटी व शर्ती मंजुर असल्याचे शपथपत्र सादर करावे जर कंत्राटदाराने ही प्रक्रिया २ दिवसांत पुर्ण न केल्यास कंत्राटदारास काम करण्याची ईच्छा नाही हे गृहीत धरुन कंत्राट कोणतेही सुचना न देता रद्य झाल्याचे समजण्यात येईल व ऊर्वरित कंत्राटदारानां नियमानुसार आमंत्रीत करण्यात येईल.कंत्राटी कर्मचाऱ्याचे वेतन निविदाधारक यांना दर महिन्याला द्यावे लागेल.जर शासकीय अनुदान उपलब्ध नसेल तर किंवा अनुदान प्राप्त होईपर्यंत ५ किंवा ६ महिन्याचा किंवा त्यापेक्षा जास्त कालावधी लागू शकतो.त्या कालावधीमध्ये आपणाला रोजंदारी कर्मचाऱ्यांचे वेतन चुकते करावे लागेल,याची आवर्जुन नोंद घ्यावी.

२९. नियमानुसार श्रमिकांचे भविष्य निर्वाह निधी ,विमा,आयकर ईत्यादी सर्व प्रकारचे देणे कंत्राटदाराला करावे लागेल.त्यासाठी महाविद्यालय कोणतीही जबाबदारी स्वीकारणार नाही.

३०. वयोमर्यादा शासकीय नियमानुसार राहील.

३१. G.S.T. व इतर करासहित दर दयावेत.

३२. लेखाशिर्ष 22020291-10 मध्ये तरतूद प्राप्त झाल्यानंतर देयक कोषागारात सादर करण्यात येईल.इतर कुठल्याही लेखाशिर्षामधून आपणास देयक अदा केले जाणार नाही याची आपल्या दप्तरी नोंद घ्यावी.

३३. मा.प्राचार्य,शासकीय अध्यापक महाविद्यालय,यवतमाळ हे कंत्राट कोणत्याही कारणास्तव कोणत्याही क्षणी रद्य करण्याचे अधिकार राखुन ठेवत आहे.

३४. वरीलप्रमाणे नमुद सर्व अटी व शर्ती मला मान्य आहेत.

प्राचार्य<br>
शासकीय अध्यापक महाविद्यालय<br>
यवतमाळ